|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव- ४२५००१

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON – 425001

## परीक्षा उत्तरार्ध विभाग

जा.क्र.उमवि/७-आय/कें.मु.प्र./2620/२०१८ दि.१३/०६/२०१८

प्रति,

मा.प्राचार्य,

उमविशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालये.

विषय:- माहे एप्रिल/मे-२०१८ मध्ये आयोजित परीक्षेतील अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेंर्तगत F.E. Engineering Mathematics-I&II व Engineering Mathematics-III या विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकनासाठी अध्यापकांना कार्यमुक्त करणेबाबत..

महोदय,

विद्यापीठाच्या माहे एप्रिल/मे-२०१८ मध्ये घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेंर्तगत विविध वर्गाच्या,विविध विषयांच्या उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation चे कामकाज विद्यापीठाने निश्चित केलेल्या विविध केंद्रांवर दि. ०१/०६ /२०१८ पासून सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी विद्यापीठामार्फत संबंधित अध्यापकांना नियुक्तीपत्रेही पाठविण्यात आली आहेत.मात्र अध्यापकांची संबंधित मुल्यांकन केंद्रांवरील संख्या अत्यंत अल्प आहे.

यासंदर्भात प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदयानुसार ३०/४५ दिवसांच्या आत परीक्षांचे निकाल जाहिर करणे विद्यापीठांना बंधनकारक आहे. याकरीता आपल्या महाविद्यालयातील विद्यापीठाने परिनियम ४१५(१) नुसार मान्यता दिलेल्या व ज्या प्राध्यापकांना कमीत कमी ०२ वर्षाचा अनुभव आहे, अशा F.E. Engineering Mathematics-I&II व Engineering Mathematics-III हे विषय शिकवित असलेल्या प्राध्यापकांना महाविद्यालयाचे शिफारस पत्र देवून आपले महाविद्यालय ज्या मुल्यांकन केंद्राशी जोडण्यात आलेले आहे, तेथे प्राधान्याने त्वरीत पाठविण्यात यावे.

केंद्रीय मुल्यमापन प्रकल्पाचे कामकाज अत्यंत महत्वाचे व विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना परीक्षेचे कामकाज करणे बंधनकारक आहे.त्या दृष्टिकोनातून आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केंद्रीय मुल्यमापन प्रकल्पामध्ये नियमित उपस्थिती द्यावी. असेही त्यांना सूचीत करावे. तसेच विद्यापीठाचा कार्यमुक्त आदेश असल्याशिवाय संबंधित प्राध्यापकांना महाविद्यालयात रुजू करुन घेऊ नये. याबाबत सर्व संबंधितांना निर्देश द्यावेत ही विनंती.

उपरोक्त बाब विचारात घेता विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे निकाल वेळेत जाहिर करणेसाठी, आपल्या महाविद्यालयातील F.E. Engineering Mathematics-I&II व Engineering Mathematics-III या विषयांचा अध्यापनाचा कमीत कमी ०२ वर्षाचा अनुभव असलेल्या व परिनियम ४१५(१) नुसार मान्यता असलेल्या प्राध्यापकांना आपल्या महाविद्यालयाशी संबंधित मुल्यांकन केंद्रावर त्वरीत पाठविण्यात यावे. ही विनंती.

आपला विश्वासू

13/6/18

प्र.संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीसाठी :-

१) मा. कुलगुरु कार्यालय, उ.म.वि. जळगाव

२) मा.कुलसचिव कार्यालय उ.म.वि. जळगाव

३) संगणक केंद्र प्रमुख, उ.म.वि. जळगाव